# ‘हमारा आयुष हमारा स्वास्थ्य’ : कोरोना प्रबोधन

# दि - २७/०६/२०२२

दि. २७/०७/२०२२ रोजी, ज्ञानगंगा विद्यानिकेतन प्राथमिक विद्यालय मांची हिल, आश्वी बु.येथे वैद्य.शिवपाल खंडीझोड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत कोरोना विषाणू संसर्गाच्या व प्रदुर्भावाच्या संभाव्य चौथ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर योग्य ती खबरदारी घेऊन ‘हमारा आयुष हमारा स्वास्थ्य’ या उपक्रमांतर्गत कोरोना काळात घ्यावयाची काळजी या विषयावर वैद्य. शिवपाल खंडीझोड यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. प्राथमिक विद्यालयात सर्व विद्यार्थ्यांसाठी एकत्रित हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.दुपारी ठीक २.०० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कोरोनाच्या काळात मास्क वापरणे,सॅनिटायझर चा उपयोग करणे,सोशल डिस्टन्सिंग ठेवणे इ.गोष्टींचे महत्व समजावून सांगितले.

या व्याख्यानाचे आयोजन प्राथमिक विद्यालयातील शिक्षिका दुकळे मॅडम यांनी केले.यावेळी वैद्य.शिवपाल खंडीझोड यांचा सत्कार करण्यात आला.अशा प्रकारे यशस्वी पणे कार्यक्रम संपन्न झाला.


H956+8CG, Road, Manchi, Maharashtra 413714, India
Manchi
Maharashtra
India
2022-06-27(Mon) 02:18(PM)
31°C
88°F
Ashvin Rural Ayurvedic College, Manchi Hill...
Google

